


# सार्वजनिक सेवांची सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया

## अंबेजोगाई तालुक्यातील यंत्रणा उत्तरदायी करण्यासाठीची नावीन्यपूर्ण प्रक्रिया

सार्वजनिक सेवांची अंमलबजावणी शासकीय यंत्रणा करते. पण ही जबाबदारी यंत्रणा योग्य रितीने पार पाडते की नाही यावर देखरेख कुणी करायची? का आणि कशी करायची? या प्रश्नांची उत्तरे अगदी स्पष्ट आहेत. **जे लोक या सेवा घेतात, त्यांनीच सेवांच्या देखरेखीची जबाबदारीही घेतली पाहिजे, तरच त्यांना सेवेचा योग्य प्रकारे लाभ मिळेल आणि सेवेचा दर्जाही टिकून राहील.** हे मान्य असलेल्या गावातील काही जणांनी देखरेख कशी करायची याचेही उत्तर शोधले आणि सार्वजनिक सेवांच्या देखरेखीसाठी सामाजिक अंकेक्षणाची पद्धत वापरण्याचे ठरवले. **प्रायोगिक तत्त्वावर महाराष्ट्रातल्या बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई तालुक्यातील १२ गावात 'सार्वजनिक सेवांचे सामाजिक अंकेक्षण' करण्यात आले.** गावातील 'गावगटां'च्या पुढाकाराने झालेल्या या कामाला 'मानवलोक' आणि 'साथी' संस्थेची साथ होती. गावगटांनी स्थानिक गरजांप्रमाणे सेवांची निवड करून अंकेक्षणाचा एक टप्पा पूर्ण केला. या अनुभवातून त्यांच्या लक्षात आले की, **जेव्हा पूर्ण माहितीनिशी, नेमकेपणाने आणि सामूहिकपणे प्रश्न विचारू लागले, तेव्हा यंत्रणाही उत्तरदायी होऊ लागली, परिणामी सेवांचा दर्जा सुधारू लागला.**



## पार्श्वभूमी

**'लोकाधारित** देखरेख व नियोजन' ही संकल्पना महाराष्ट्रामध्ये गेल्या बारा वर्षांपासून राबवली जात आहे. 'राष्ट्रीय आरोग्य अभियाना'मार्फत (NHM) सरकारी आरोग्य सेवांच्या देखरेखीसाठी ही पद्धती प्रथम अवलंबली. आरोग्य सेवांविषयी लोकांच्या ज्या तक्रारी असतील त्या मांडण्यासाठी एक जागा आणि त्या तक्रारी दूर करण्याची लोकाभिमुख पद्धती यात तयार करण्यात आली. आरोग्य सेवांचा दर्जा उंचावण्यामध्ये आणि गरजूंसहित अधिकाधिक लोकांपर्यंत सेवा पोहोचण्यासाठी या प्रक्रियेने हातभार लावलेला आहे. ही प्रक्रिया अजून विकसित व्हावी आणि सरकारी आरोग्य यंत्रणाचे उत्तरदायित्व वाढावे म्हणून काही नवीन प्रयोग होणे आवश्यक आहे. असा विचार करून 'साथी' संस्थेने काही निवडक संस्थांसोबत मिळून हा सामाजिक उत्तरदायित्वाचा प्रयोग करायचे ठरवले. **केवळ आरोग्य सेवांपुरती लोकाधारित देखरेख सीमित न ठेवता शिक्षण, पोषण, रोजगार, पाणी, स्वच्छता, शेती या व अशा विविध सामाजिक क्षेत्रांचाही त्यात समावेश केला गेला.** एकाच सेवेवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी लोकांच्या जगण्याशी संबंधित सर्वच मुद्द्यांचा समावेश केल्याने हे काम लोकांना अधिक आपलेसे वाटले व त्यांचा सहभाग वाढला. प्रत्येक गावाने त्यांच्या जिव्हाळ्याच्या सेवा स्वतः निवडल्या आणि या सेवा सुरळीत करण्याच्या दृष्टीने देखरेख केली. स्थानिक कर्मचारी आणि संबंधित यंत्रणेचे उत्तरदायित्व वाढवणे हा या देखरेख प्रक्रियेचा हेतू होता.

## देखरेख कोणी केली?

- **देखरेखीची जबाबदारी 'गावगटा'ने घेतली.** यासाठी प्रातिनिधिक व समावेशक असा गावगट तयार केला गेला.
- प्रत्येक सामाजिक सेवेमध्ये देखरेख करण्यासाठी समित्या/जागा आहेत, आरोग्य सेवांच्या लोकाधारित देखरेखीसाठी ही समिती आहे, तरीही स्वतंत्र गावगट असणे जरूरीचे होते. कारण **विविध समित्या या संबंधित विषयांपुरताच विचार करतात. शिक्षण समितीचे काम आरोग्य समितीला समजत नाही आणि आरोग्य समितीचे पोषण समितीला समजत नाही इत्यादी.** कामाच्या विभागणीने होणारी लोकांची विभागणी गावगटाच्या उभारणीतून टाळता येईल, असा यामागे विचार होता. शिवाय सर्व समित्या सक्रिय असतातच असे नाही. विविध समित्यांमधील सक्रिय सदस्यांना गावगटात सामावून घेता आले. याशिवाय देखरेखीच्या कामात सहभागी होण्याची तयारी असलेल्या, स्वयंप्रेरित लोकांनाही या गटात स्थान मिळाले.
- गावगटाकडे योजनांविषयी परिपूर्ण माहिती आणि देखरेखीची कौशल्ये असणे महत्त्वाचे आहे. त्यासाठीच्या प्रशिक्षणांची जबाबदारी मानवलोक संस्थेने घेतली. गावगटाने देखरेखीसाठी निवडलेल्या सेवा आणि देखरेखीची कार्यपद्धती या दोन्ही विषयांवरील प्रशिक्षण व साहाय्य साथी संस्थेकडून दिले गेले आणि त्यामुळे गावगटांची समज व ताकद वाढली.

## गाव निवड : प्रक्रिया आणि निकष

मे २०१८ मधील बैठकीनंतर बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई तालुक्यातील गाव निवडीची प्रक्रिया करण्यात आली. सामाजिक सेवांच्या देखरेखीचे काम प्रायोगिक तत्त्वावर असल्याने आणि त्यामध्ये गावगटाची भूमिका महत्त्वाची असल्याने खालील प्रक्रिया व निकषांच्या आधारे प्रत्येकी १० गावांची निवड केली;

- **गावातील संस्थेच्या संपर्कातील १२ ते १५ गावांमधील सार्वजनिक सेवांचे प्रश्न प्रश्नावलीच्या आधारे समजून घेतले.**
- **गावस्तरावर सहभागी पद्धतीने बैठकीतून गावकऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या जिव्हाळ्याचे**

आणि प्राधान्याचे प्रश्न समजून घेतले.

- गावातील सरपंच, सदस्य अन्य ग्रामस्थ यांच्यासोबत बैठक घेऊन चर्चेतून स्थानिक प्रश्न समजून घेतले.
- सामाजिक सेवांवर देखरेख करण्याचे काम म्हणजे स्थानिक कर्मचाऱ्यांना, लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारण्याचे, त्यांच्या कामातील उणिवा व भ्रष्टाचार उघड करण्याचे काम. असे करताना स्थानिक सत्ताधाऱ्यांचे हितसंबंध दुखावले जाऊ शकतात. ही जोखीम पत्करण्याची तयारी असलेल्या गावांमधील सदस्यांना या गावगटात सामील करून घेण्यात आले. किमान ३-४ जण तयार झाले, त्या गावांची निवड केली गेली.




## गावगट - कसा असावा ?

- विविध समित्यांमधील सक्रिय सदस्यांचा गावगटात समावेश असावा.
- गावगटामध्ये विविध कौशल्ये व क्षमता असलेले लोक असावेत.
- सरकारी सेवेतून निवृत्त झालेल्या व्यक्ती असाव्यात, कारण त्यांना शासकीय यंत्रणा कशा प्रकारे काम करते याचा अनुभव असतो व तो अंकेक्षणाला मदतकारक ठरतो.
- पुरुष, महिला आणि वंचित-अल्पसंख्य समुदायांचा सहभाग अतिशय महत्त्वाचा.
- शक्यतोवर लोकप्रतिनिधी आणि स्थानिक शासकीय कर्मचारी यांचा गावगटात समावेश नसावा.

## मानवलोक संस्थेची या प्रक्रियेमधील महत्त्वाची भूमिका

गावगट बांधणीची सुरुवात गावनिवडीच्या प्रक्रियेपासून झाली. ज्या गावांमध्ये हे काम करण्यासाठी व्यक्ती पुढे आल्यात त्या गावांमध्ये काय प्रश्न आहेत? यावर चर्चा करण्यास सुरुवात करण्यात आली. त्यासाठी मानवलोक संस्थेच्या कार्यकर्त्यांनी गावगटातील सदस्यांसोबत नियमित बैठका घेऊन गावगट बांधणीला चालना दिली. स्थानिक प्रश्नांवर चर्चा करत आणि त्यातील काही प्रश्नांची सोडवणूक करत साधारणपणे सहा महिन्यात काही गावात गावगट उभे राहिले. यानंतरचा पुढील टप्पा गावगटांच्या प्रशिक्षणाचा. मानवलोक संस्थेने गावगटांच्या सोईने दोन प्रशिक्षणांचे आयोजन केले. 'सार्वजनिक सेवांचे सामाजिक अंकेक्षण' या विषयाच्या सर्व बाजू समजून देण्याचा प्रयत्न या प्रशिक्षणातून झाला.

### गावगटाच्या प्रशिक्षणाचे विषय

१. **सार्वजनिक सेवांचे सामाजिक अंकेक्षण - का व कसे करायचे ?**

२. **अंकेक्षणासाठी निवडलेल्या योजना, त्यांचे हेतू, तरतुदी, जबाबदार यंत्रणा याविषयी सविस्तर प्रशिक्षण**

३. **योजनांविषयी शासकीय माहितीचे संकलन**

४. **पडताळणी - हेतू, कोणी करायची व कशी करायची ?**

५. **जनसंवादाचे आयोजन आणि पाठपुरावा**

- सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया आपल्या गावात कशी राबवायची? याचे प्रशिक्षण आणि सातत्यपूर्ण सहकार्य या पद्धतीने सदस्यांना सक्रिय ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. स्थानिक प्रश्न गावगटांनी त्यांच्या स्तरावर सोडवण्याचा प्रयत्न करावा यासाठी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी विशेष प्रयत्न केले.




# असे केले सामाजिक अंकेक्षण...

## मुख्य टप्पे...

### १. शासकीय माहितीचे संकलन-

- **सामाजिक अंकेक्षणाच्या प्रक्रियेतील माहिती संकलन हा पहिला महत्त्वाचा टप्पा आहे.** त्यांच्याशी संबंधित माहिती मिळणे हा लोकांचा हक्क आहे. ही जाणीव लोकांना करून देण्यात आली. मानवलोकने अंबेजोगाई तालुक्यातील १० गावांमध्ये सामाजिक अंकेक्षणाची सर्व प्रक्रिया पूर्णतः गावगटांच्या पुढाकाराने व्हावी यासाठी गावगटांचा एक तालुका समन्वय गट तयार केला. या गटाच्या नावाने लेटरहेड तयार करण्यात आले. **माहिती संकलन, जनसंवाद यासाठीचा तालुका अधिकाऱ्यांसोबतचा पत्रव्यवहार संपूर्णतः तालुका समन्वय गटाने केला.**
- ज्या योजनांचा अंकेक्षणात समावेश होणार होता. **त्यांची तपशीलवार माहिती घेण्यासाठी फॉरमॅट तयार करून गावगटांना देण्यात आले. योजनेच्या सर्व लाभार्थ्यांची यादीसह सर्व तपशील घेण्यात आले.**
- शक्यतोवर गावगटांनी संबंधित कर्मचारी / अधिकाऱ्यांकडून माहिती संकलित करावी असा प्रयत्न राहिला.
- सुरुवातीला स्थानिक कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली.
- जिथे गावगटांना अडचणी आल्या तिथे त्यांना संस्थांची मदत घेतली.
- संस्थेच्या कार्यकर्त्यांनी व गावगटाने संकलित माहिती आधी स्वतः समजून घेतली आणि नंतर पडताळणीचे नियोजन केले.

### २. पडताळणी -

- सामाजिक अंकेक्षणातील पडताळणीचा टप्पा खूप महत्त्वाचा आणि बरेच शिकवणारा होता. संकलित शासकीय माहितीतील त्रुटींबरोबरच इतरही अनेक महत्त्वाच्या समस्या या दरम्यान पुढे आल्या.
- **पडताळणीमध्ये गावगटातील सदस्यांनी यादीप्रमाणे प्रत्येक लाभार्थ्यांच्या घरी जाऊन सविस्तर माहिती घेतली.** उदा. मातृत्व वंदना योजनेअंतर्गत लाभार्थी असेल तर प्रत्यक्षात किती हप्त्यांचे पैसे मिळाले, किती पैसे मिळाले हे तपासले. शक्य असेल तिथे पासबुकची नोंद पाहिली.

## १४व्या वित्त आयोगाचा पैसा सारासार विचाराने वापरणारे कुंभेफळ

*साधारण चार हजार लोकवस्तीचे कुंभेफळ हे अंबेजोगाई तालुक्यातील गाव. १४व्या वित्त आयोगाचा ग्रामपंचायतीकडे उपलब्ध निधी आणि लोकांच्या समस्या यांचा ताळमेळ जमत नव्हता. म्हणून संस्थेने सरपंचांसमोर कल्पना मांडली. त्यानुसार गावगटाचे सदस्य, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य आणि सर्व स्थानिक शासकीय कर्मचारी यांची बैठक झाली. त्यामध्ये गावांतील प्रश्नांवर चर्चा होऊन त्यांचा प्राधान्यक्रम ठरवण्यात आला. ग्रामपंचायतीच्या वार्षिक नियोजनात आवश्यक बदल मंजूर करून घेण्यात आले. उपकेंद्राची संरक्षण भिंत, अंगणवाडीला गॅस कनेक्शन, अंगणवाडीची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची सुविधा या व अशा मागे पडलेल्या गोष्टी पूर्ण व्हायला सुरुवात झाली. परस्पर संवादातून संसाधने आणि गरजा यांची सांगड घालणाऱ्या कुंभेफळचे उदाहरण अनुकरणीय आहे. प्रशिक्षणामुळे सजग झालेले गावगटाचे सदस्य अशाप्रकारे पुढाकार घेऊ लागले.*




- **शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रांची माहिती प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करून आणि तिथल्या लाभार्थ्यांशी बोलून पडताळून पाहिली.** उदा., शिक्षकांशी बोलून रजिस्टरमधील नोंदी तपासल्या, स्वयंपाकघर, वर्गखोल्या, पाणी, शौचालये सुविधा पाहिल्या, मध्यान्ह आहाराविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा केली इत्यादी.

- पडताळणीच्या वेळी वैयक्तिक लाभार्थ्यांकडून तर सहकार्य मिळालेच, पण **शिक्षक, अंगणवाडी सेविका इत्यादी कर्मचाऱ्यांनीही सहकार्य केले, कारण त्यांनाही त्यांच्या समस्या मांडायच्या होत्या. निधीचा अभाव, त्यांनी वारंवार मागण्या करूनही सुविधा न मिळणे याचा परिणाम त्यांच्या सेवांवर होत असल्याचे दिसून आले.**

- पडताळणीच्या शेवटी शासकीय माहिती, पडताळणीतून दिसून आलेल्या तफावती, लाभार्थ्यांनी सांगितलेल्या अडचणी, नव्याने समोर आलेले मुद्दे यांची नोंद करून ठेवली.

- वरवर पाहता सुरळीत चाललेल्या सार्वजनिक योजनांच्या अंतरंगात किती समस्या आहे? हे पडताळणीच्या प्रक्रियेतून प्रकर्षाने पुढे आले.

### ३. गाव जनसुनवाईची पूर्वतयारी-

इतर टप्प्यांप्रमाणे पूर्वतयारीचा टप्पाही महत्त्वाचा आहे. यात एकाच वेळी अनेक पातळ्यांवर काम केले गेले. **लोकसहभाग वाढवण्यासाठी गावात जाणीवजागृती व प्रचार करण्यात आला, संबंधित सरकारी अधिकारी उपस्थित राहतील यासाठी पाठपुरावा करण्यात आला.** तालुका समन्वयक गटाने अधिकाऱ्यांना तसे पत्र पाठवले, तसेच गावच्या सरपंचांनीही संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना जनसंवादात सहभागी होण्यासाठीचे पत्र पाठवले आणि वैयक्तिक पाठपुरावाही केला.

- सामाजिक अंकेक्षणाची व जनसुनवाईची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध माध्यमांचा वापर करण्यात आला - कला पथक, पोस्टर प्रदर्शने, पत्रकांचे वितरण इत्यादी.

- संबंधित विभागांचे शासकीय अधिकारी येतील याची खबरदारी घेतली गेली.

## माहिती संकलनादरम्यान तर काही वेळा पडताळणी दरम्यान प्रश्न सुटू लागले...

*अंबेजोगाईच्या पठाणमांडवामध्ये गावगटाने रेशनच्या प्रश्नाची माहिती घेऊन अंकेक्षण करायचे ठरवले. गावातला रेशन दुकानदार नागरिकांना त्यांच्या वाट्याचे ५० टक्के धान्य द्यायचा आणि पावती १०० टक्क्याची करायचा. ग्राहकांना पावती द्यायचाच नाही. गावगटातील एका सदस्याने रेशन घेतल्यावर पावतीची मागणी केली. दुकानदार टाळाटाळ करू लागला. त्याला जाब विचारला 'तेव्हा तुम्हाला तुमचे रेशन देतो' असे म्हणत त्यांना आपल्या बाजूला वळवायचा प्रयत्न करायला त्याने सुरुवात केली. ऑनलाईन व ऑफलाईन कार्डधारकांना वेगवेगळ्या प्रकारे माल दिला जात होता. पावती दिली जात नव्हती. या समस्यांची तक्रार गावगटाने तहसीलदाराकडे केली. संबंधित अधिकारी गावात आले तेव्हा समन्वय गटाने बरेच लोक जमवले. लोकांच्या प्रश्नांना अधिकारी नीट उत्तरे देत नव्हते. काहींनी मोबाईल कॅमेरे सुरू केले, त्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला. सर्वांना १०० टक्के माल मिळणार व दिलेल्या मालाची पावती मिळणार हे दुकानदाराने कबूल केले. या गावात रेशनची परिस्थिती सुधारली आहे याची बातमी जवळपासच्या गावातही पोहोचली. रेशनचा प्रश्न प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा असल्याने तुम्ही हे कसे केले हे पंचक्रोशीतील लोक गावगटातील लोकांना विचारू लागले.*



### ४. गाव जनसुनवाई-

- गावातील समस्या व त्या विषयीच्या मागण्या यांचा माहितीफलक कार्यक्रमाच्या ठिकाणी लावण्यात आला. राज्यघटना, नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये यांची माहिती देण्यात आली.
- **सर्वसहमती, सामंजस्याचे वातावरण राहिले पाहिजे याची खबरदारी घेतली.**
- सर्व समाजाचे लोक, सर्व वयाचे लोक, महिला-पुरुष सहभागी होतील आणि कार्यक्रम सर्वसमावेशक होईल असा प्रयत्न केला.
- सामाजिक अंकेक्षणापूर्वी आणि नंतर वर्तमानपत्रात बातम्या दिल्या, ज्यामुळे बाकी गावातही याची माहिती झाली.
- **सामाजिक अंकेक्षणाच्या प्रक्रियेतील निष्कर्षांचा अहवाल तयार करण्यात आला. त्याआधारे शासकीय माहिती व पडताळणीतून मिळालेली माहिती यांच्यातील तफावत दर्शवणारा व गावगटाच्या मागण्यांची मांडणी करणारा फलक कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आला.**
- **अनेक लोकांना त्यांचे प्रश्न मांडता आले, समस्या कुठे मांडायच्या हीच समस्या आहे, काहींनी आपला रोष व्यक्त केला.** प्रत्येक गावातील सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेचा व जनसुनवाईचा अहवाल तयार करण्यात आला.
- पाठपुराव्याचे नियोजन करण्यात आले.

### ५. तालुका जनसुनवाई-

- स्थानिक पातळीवर न सुटलेल्या मुद्द्यांचा गावगटामार्फत पाठपुरावा करून तालुका जनसुनवाईचे आयोजन केले.

## ‘सुगाव’मध्ये निधीचा नव्हे तर नियोजनाचा अभाव

*एकूण २८०० लोकसंख्येचे आणि हिंदू-मुस्लिम संमिश्र वस्तीचे अंबेजोगाई तालुक्यातील सुगाव. गावात जिल्हा परिषदेच्या दोन शाळा आहेत - एक मराठी माध्यमाची आणि एक उर्दू माध्यमाची. तीन अंगणवाड्या आहेत. एक सुसज्ज उपकेंद्र आहे. या तिन्ही सेवांच्या माहितीसह १४व्या वित्त आयोगाच्या निधीची माहिती गावगटाने ग्रामपंचायतीकडून मिळवली होती. पडताळणीची सुरुवात उर्दू माध्यमाच्या जिल्हा परिषद शाळेपासून झाली. फॉरमॅटनुसार एकेका मुद्द्याची माहिती घेत असताना मुख्याध्यापकांनी त्यांच्या समस्यांची भर घातली. पायाभूत सुविधांबाबत शाळेत बऱ्याच समस्या आहेत. शाळेच्या समोर मोकळी जागा आहे तिचा मैदान म्हणून वापर होतो, पण त्याला कुंपण नाही, त्यामुळे सर्व लहान-मोठ्या वाहनांचा शिरकाव या जागेत होत असतो. एकूण आठवीपर्यंत वर्ग आहेत, पण वर्गखोल्यांची संख्या कमी आहे. कारण दोन वर्गखोल्यांचे बांधकाम २०१२ पासून अर्धवट रखडलेले आहे. पाण्याची सुविधा नाही. मराठी माध्यमाच्या शाळेची इमारत नादुरुस्त आहे. इथेही पाण्याची सोय नाही. शौचालय बंद पडलेले आहे. दोन्हीकडच्या मुख्याध्यापकांनी सांगितले की त्यांनी ग्रामपंचायतीकडे वारंवार मागणी करूनही कामे होत नाहीत. पडताळणी गटाने ग्रामसेवकाकडून माहिती घेतली, तेव्हा ग्रामपंचायतीच्या खात्यावर २७ लाख रुपये शिल्लक आहे. तरीही शाळांच्या मागण्यांचा विचार का केला गेला नाही, या प्रश्नाला ग्रामसेवकाकडे उत्तर नव्हते. निधीचा नव्हे तर नियोजनाचा अभाव आहे ही गोष्ट पडताळणीतून स्पष्ट झाली.*

# सामाजिक अंकेक्षणानंतरच्या गावस्तरावरील सकारात्मक घटना



## कर्मचारी नियमित येऊ लागले-

अनेक गावांमध्ये कर्मचारी येत नाहीत ही तक्रार होती. सामाजिक अंकेक्षणाच्या प्रक्रियेतून जी वातावरण निर्मिती झाली त्याचा थेट आणि दृश्य परिणाम म्हणजे हे कर्मचारी नियमित येऊ लागले.

- **पूस** गावात **कृषीसाहाय्यक** कधीच येत नसत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीच्या योजना वेळेवर समजायच्या नाहीत. जनसुनवाईच्या वेळी लोकांनी शेतीविषयी बरेच प्रश्न विचारले आणि कृषी साहाय्यकाने वेळेवर योजनांची माहिती द्यावी अशी मागणी केली. त्यानंतर कृषी साहाय्यक नियमितपणे गावभेट करू लागले. **येल्डा** गावातसुद्धा असाच बदल झालेला दिसून आला.
- **सुगाव**मध्ये उपकेंद्राची नवी सुसज्ज इमारत तयार आहे. निवासाची चांगली सोय असूनही नर्स तिथे राहत नसे. ग्रामपंचायतीने यापूर्वी वारंवार सांगूनही जो फरक पडला नव्हता, तो जनसुनवाईनंतर पडला. आणि **नर्स उपकेंद्रामध्ये २४ तास उपलब्ध होऊ लागली.**

## ग्राम सेवक वेळेवर येऊ लागले-

ग्रामपंचायतच्या माहिती संकलनातून असे लक्षात आले की भावठाणा ग्रामपंचायतकडे १४ व्या वित्त आयोगाचे लाखो रुपये शिल्लक आहेत. पण ग्रामसेवक नियमित येत नसल्याने गावातील प्रश्न सोडवले जात नाहीत, त्यामुळे गावाचा विकास थांबला आहे. गावाच्या विकासाचा आराखडा तयार केलेला नव्हता किंवा त्याचे नियोजन नव्हते. जनसुनवाईमध्ये या प्रश्नावर गावातील लोकांनी बराच भर देऊन प्रश्न उपस्थित केले. जनसुनवाईला उपस्थित राहण्याचे पत्र गावगटाने ग्रामसेवक यांना दिले. तसेच गट विकास अधिकाऱ्यांनी जनसुनवाईला उपस्थित राहण्याचे पत्र ग्रामसेवक यांना दिले. गावगटाने याबाबत ग्रामसेवकासोबत फोनवर पाठपुरावा केला. तरीही ग्रामसेवक जनसुनवाईला आले नाहीत. मग चिडलेल्या ग्रामस्थांनी पुन्हा गटविकास अधिकारी यांच्याशी चर्चा केली. आता गटविकास अधिकारी यांच्या सक्त ताकिदीमुळे ग्रामसेवक बुधवार आणि शनिवार गावात उपस्थित राहत आहे.

## लाभ वितरणामध्ये सुसूत्रता येऊ लागली आहे-

वैयक्तिक लाभाच्या योजनांमधील बऱ्याच त्रुटी पडताळणी दरम्यान उघड झाल्या. विशेषतः मातृत्व वंदना योजनेमधील सर्व हप्त्यांचा लाभ न मिळणे अशा केसेस समोर आल्या. त्यांची जनसुनवाईत चर्चा झाल्यानंतर लाभ लगेच दिले जाऊ लागले. प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचून योजनेचा लाभ दिला जात असल्याने मागील वर्षीपेक्षा या वर्षी लाभार्थी संख्या वाढली असल्याचे मानवलोक संस्थेचे निरीक्षण आहे.

## कुंभेफळमधील आरोग्य उपकेंद्र कार्यरत झाले-

महिन्यातून किमान एकदा प्रा.आ.कें.च्या वैद्यकीय अधिकारी यांनी उपकेंद्र स्तरावर भेट देऊन गरोदर स्त्रिया, बाळंत महिला, बालके, वृद्ध व्यक्तींना तपासावे असे गावातील लोकांचे मत होते. पण तसे होत नव्हते. जनसंवाद कार्यक्रमात हा मुद्दा चर्चेला आल्यानंतर सरपंचानी औषधे आणि इतर तपासणी साहित्य १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून आणण्याचे आश्वासन दिले. मग वैद्यकीय अधिकारी यांनी मान्य केले की महिन्यातून दोन दिवस उपकेंद्र स्तरावर येऊन ते सेवा देतील.

# सहभागी संस्थांविषयी...

## मानवलोक, अंबेजोगाई, बीड

'मानवलोक' संस्था अंबेजोगाईमध्ये मागील तीन दशकांपासून काम करत असून संस्थेने गावागावात स्वयंसेवी कार्यकर्ते निर्माण करुन बहुसंख्य गावांमध्ये संपर्क प्रस्थापित केले आहेत. हा भाग दुष्काळी असल्याने गावांमध्ये लोकसहभागातून अनेक प्रकारची कामे करण्याबरोबरच मानवलोककडे सरकारी यंत्रणेशीही समन्वय राखून स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करण्याचे कौशल्यही आहे.

शेती, पाणी, पाणलोट क्षेत्रविकास, किशोरी सक्षमीकरण कार्यक्रम, शिक्षण, आरोग्य, महिला अधिकार, बचतगट या विषयांना प्राधान्य देऊन संस्थेचे काम चालू आहे.

## साथी, पुणे

'साथी' टीमची सुरुवात १९९८ मध्ये 'सेहत' संस्थेचा एक भाग म्हणून झाली, त्यानंतर २००५ पासून 'साथी' स्वतंत्रपणे काम करू लागली. साथी मुख्यतः आरोग्य हक्कावर आणि सार्वजनिक आरोग्य सेवा सक्षम करण्याच्या भूमिकेतून ॲडव्होकसीचे काम करत आहे. साथी संस्था विविध स्वयंसेवी संस्थांसोबत संस्थांचे कार्यकर्ते व लोकांचे सक्षमीकरण, संशोधने, प्रशिक्षण, माहिती साहित्य तयार करण्याचे काम करत आहे.

आरोग्य सेवांच्या लोकाधारित देखरेख व नियोजनात राज्य समन्वयक संस्था म्हणून 'साथी' स्थानिक समन्वयक संस्थांना प्रशिक्षण व साहाय्य देण्याबरोबरच विविध विषयांवरील माहिती साहित्य, अभ्यास, अहवाल प्रकाशित करण्याचे काम करत आहे.

### अंगणवाडीला मिळणारे धान्य साठवण्यासाठी खोली-

**पूस**मधील तीन अंगणवाड्या एकाच परिसरात चालतात, अंगणवाडीच्या खोल्या लहान असल्यामुळे एकाच खोलीत मुले आणि धान्य असे दोन्ही ठेवले जात आहे. पण यामुळे मुलांना त्याचा नाहक त्रास होत आहे, याबद्दल अंगणवाडी सेविकांनी आपली अडचण जनसुनवाईमध्ये मांडली. त्यानंतर जनसुनवाईमध्ये झालेल्या निर्णयानुसार सरपंच आणि ग्रामसेवकाने अंगणवाडी शेजारील रिकामी असलेल्या खोलीची दुरुस्ती करून ती धान्य साठवण्यासाठी देण्याचे कबूल केले.

### आरोग्य पथकाला मिळाले नियमित वैद्यकीय अधिकारी-

**येल्डा** गाव हे डोंगरी भागातील गाव असून त्या भागातील सात ते आठ गावांना आरोग्य सेवा मिळण्यासाठी आरोग्य पथकाची स्थापना करण्यात आली. या आरोग्य पथकाबद्दल गावकऱ्यांच्या नेहमी काही ना काही तक्रारी राहिल्या आहेत, त्यात पथकाचे डॉक्टर वेळेवर न येणे, आले तरी लवकर निघून जाणे, तसेच इतर कर्मचारी चांगली सेवा देत नाहीत असे प्रश्न जनसुनवाईच्या निमित्ताने चर्चेला आले. जनसुनवाईला उपस्थित राहण्याचे पत्र देऊनही डॉक्टर जनसुनवाईला उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे याबाबत त्यांची तक्रार तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे करण्यात आली. यापूर्वीही १०४ टोल फ्री क्रमांकावरून तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांना अशी तक्रार केली होती. पण जनसुनवाईमुळे तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी या तक्रारीची दाखल घेत संबंधित डॉक्टरांची बदली करून दुसरे डॉक्टर आरोग्य पथकाला नियुक्त केले आहेत.

### देखरेखीचे महत्त्व गावगटांना पटू लागले-

**सुगाव**मधील जुने वृक्ष तोडण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने परस्पर घेतला. तो समजल्यावर गावगटाने आक्षेप घेतला, ग्रामपंचायतीला लेखी पत्र दिले आणि कारण विचारले. त्यानंतर ग्रामपंचायतीने वृक्ष तोडण्याचा निर्णय मागे घेतला.

Support for Advocacy & Training to Health Initiatives
साथी

**प्रकाशक -**
**साथी (Support for Advocacy & Training to Health Initiatives)**
अमन-ई टेरेस, प्लॉट नं. १४०, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८
फोन : (०२०) २५४७३५६५, २५४७२३२५
**E-mail** : sathicehat@gmail.com, **Website** : www.sathicehat.org
**मुद्रण** - एन.आर. एंटरप्रायझेस, पुणे
**डिसेंबर, २०१९**